February 2015

Volumn V Issue II

# e Jalseva Bulletin

## संपादकीय



श्री. टी. एन. मुंडे
मुख्य अभियंता व सहसचिव, मंत्रालय मुंबई

जलसंपदा विभागाच्या महत्वाकांक्षी ई-जलसेवा प्रणालीमध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी माहिती भरलेली आहे. या माहितीचा वापर दैनंदिन कामकाजामध्ये करण्याबाबत शासनाने दि. २९/०१/२०१५ रोजी आदेश निर्गमित केलेले आहे. याबाबत सर्व अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी कोणतीही माहिती मागविण्यापूर्वी प्रणालीमध्ये ती उपलब्ध आहे हे आधी तपासावे. या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावर माहिती तयार करण्यासाठी लागणारा वेळ वाचेल. प्रणालीमध्ये भरलेली माहिती जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावर सर्व सामान्य नागरिकांना तसेच स्टेट डाटा बँकेमार्फत शासनातील विविध विभागांसाठी उपलब्ध असल्याने सदर माहिती वेळोवेळी अद्ययावत ठेवण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

या महिन्यात नवी दिल्ली येथे झालेल्या India Water Week-2015 या आंतरराष्ट्रीय जल-परिषदेमध्ये आपल्या विभागातील अधिकारी तसेच जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद येथील प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता व त्यांचेमार्फत एकुण २७ शोध निबंध सादर करण्यात आले. या परिषदेमध्ये विभागाचे प्रधान सचिव श्रीमती मालिनी शंकर यांना देखील गटचर्चेकरीता विशेष आमंत्रित करण्यात आले होते. राज्यासाठी ही अभिमानाची बाब असून अशा प्रकारच्या परिषदांमध्ये इतर अभियंत्यांनी देखील सहभागी व्हावे असे आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे.

जलसंपदा विभागातील उप-अभियंता संवर्गातील STeDE हे प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले होते. आजतागायत एकूण ६३८ अधिकाऱ्यांनी सदरचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. तथापि अद्याप ज्या अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण केलेले नाही त्या सर्वांनी मार्च २०१५ पर्यंत मेटा नाशिक येथे प्रशिक्षण पूर्ण करण्याची संधी घ्यावी.

जलसंपदा विभागाने ई सेवा पुस्तक हा महत्वपूर्ण प्रकल्प हाती घेतला असून. या महिन्यात प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची वैयक्तिक माहिती भरण्यासाठी (Data Entry) प्रणाली उपलब्ध होणार आहे. आतापर्यंत विभागातील बहुतांश DDO तसेच संबंधित कर्मचारी यांनी यामध्ये सक्रिय सहभाग दर्शविला आहे. यानंतरही त्यांचेकडून अशाच प्रकारच्या चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. ई-प्रशासनाकडे आपल्या विभागाची वाटचाल सुरु असुन या ई-प्रणालीचा वापर विभागातील सर्व स्तरावर करणे ही आपली प्राथमिकता आहे. त्यादृष्टीने आपण सर्व कार्यरत होऊ या!

## इंडिया वॉटर वीक-२०१५ मध्ये जलसंपदा विभागाचा महत्वपुर्ण सहभाग

श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता,
परिवर्तन व्यवस्थापन, ई-प्रशासन कार्यालय, पुणे

दि. १३ ते १७ जानेवारी २०१५ या कालावधीमध्ये नवी दिल्ली येथे इंडिया वॉटर वीक-२०१५ या आंतरराष्ट्रीय जल परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यापुर्वी सन २०१२ मध्ये पहिल्या तर २०१३ मध्ये दुसऱ्या इंडिया वॉटर वीक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते व या वर्षी या परिषदेचे तिसरे वर्ष होते. केंद्र शासनाच्या जलसंसाधन विभागाने या परिषदेचे आयोजन केले होते व त्यास ऑस्ट्रेलिया सरकारने पार्टनर कन्ट्री तर महाराष्ट्र राज्याने पार्टनर स्टेट म्हणुन महत्वपुर्ण सहभाग नोंदविला. दि. १३ जानेवारी २०१५ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे पार पडलेल्या उद्‌घाटन कार्यक्रमास मा. श्रीमती उमा भारती, मा. श्री. एम. वैंक्कया नायडु, मा. श्री. प्रकाश जावडेकर, मा. श्री. सनवरलाल जाट, व मा. श्री. मार्टिन हॅमिल्टन हे उपस्थित होते.

"चिरंतन विकासासाठी जलव्यवस्थापन" (Water Management for Sustainable Development) या विषयसुत्रावर इंडिया वॉटर वीक-२०१५ ही जल परिषद आयोजित करण्यात आली होती. या अंतर्गत प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे विविध विषयांवरील चर्चासत्र, शोधनिबंध सादरीकरण, विचारमंथन, केस स्टडीज सादर करण्यात आल्या. तसेच जल विषयक प्रदर्शन देखील भरविण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याने या प्रदर्शनात भाग घेतला असून, अनेक मान्यवरांनी राज्याच्या स्टॉलला भेट दिली होती.

जलसंपदा विभागातील अधिकारी तसेच जल व भुमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद येथील प्राध्यापक यांनी या परिषदेमध्ये सुमारे २७ शोध निबंध सादर केले होते. या माध्यमातुन विभागाने केलेल्या नाविन्यपुर्ण कामांची मांडणी देशपातळीवर करण्यात आली व त्याची योग्य ती दखल देखील घेण्यात आली.

या परिषदेस शासनाच्या वतीने सहभागी झालेल्या प्रतिनिधींनी त्यांना आलेला अनुभव, तसेच या परिषदेमध्ये सहभागी होण्याची कार्यपध्दती याबाबत दृकश्राव्य माध्यमाद्वारे विभागातील इतर अधिकाऱ्यांना दि. २३ जानेवारी २०१५ रोजी मार्गदर्शन केले. त्यास चांगला प्रतिसाद लाभला होता. तसेच एक प्रतिनिधी श्री. प्रविण कोल्हे यांचा या परिषदेबाबतचा अहवाल http://pravinkolhe.com/pdf/paper/IWW-2015_Report_Pravin_Kolhe.pdf या लिंकवर उपलब्ध करुन दिला आहे.

या सारख्या परिषदेमध्ये इतर अभियंत्यांनी देखील सक्रिय सहभाग घ्यावा अशीच या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

February 2015

Volumn V Issue II

# e Jalseva Bulletin

## चला सिंचन शाखा घडवू या !

कु. अंजु सोंडवले
सहा. अभि. श्रेणी- १

"सिंचन शाखा" जलसंपदा विभागात सर्वात खालच्या स्तरातील कार्यालय असले तरी या कार्यालयाचा सिंचनासाठीचा फार मोठा वाटा आहे. सिंचन शाखेमधून वेगवेगळया बाबींसाठी पाणी दिले जाते. त्यामध्ये पिण्यासाठी, औद्योगिक व व्यापारी यांचा समावेश असतो. यामध्ये सिंचन शाखा यांचा प्राधान्याने शेतकरी, स्थानिक स्वराज्य संस्था, औद्योगिक/व्यावसायीक संस्था यांच्याशी संर्पक येत असतो.

अशीच एक गोष्ट " येडगाव धरण शाखा कार्यालयाची"


जलसंपदा विभागात सिंचन शाखेचे महत्व लक्षात घेता महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग यांनी दि. २२ ऑगस्ट २०१४ रोजी संकीर्ण-२०१४/प्र.क्र.२२२/२०१४/आ (प्रशि) हा शासन निर्णय निर्गमीत झाला आहे. या शासन निर्णयानुसार मा. मुख्य अभियंता यांनी ऑगस्ट २०१४ पासून जून २०१५ पर्यंत प्रत्येक महिन्याला एका शाखा कार्यालयाचे आधुनिकीकरण करावयाचे आहे. या मोहीमेला प्राधान्य देत मा. मुख्य अभियंता (विप्र) पुणे अंतर्गत येडगाव धरण शाखा कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले.

येडगाव धरण शाखा कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून प्राप्त माहिती नूसार ही शाखा फक्त शेतक-यांसाठी उपयोगी केलेली नसून या शाखेमध्ये इतर बऱ्याच मोठ्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी Rain gauge ची देखभाल, परिसर स्वच्छता, नोटीस बोर्ड, कार्यक्षेत्राचा नकाशा, लाभधारकांसाठी मार्गदर्शक सूचना व सुविधा, हंगामाचे वेळापत्रक व पाणी परवान्यासाठी सुचना व सुविधा इत्यादी संबंधीत माहितीचे फलक कार्यालयात लावण्यात आलेले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे या कार्यालयाने दैनंदिन व महत्त्वाच्या कामकाजात केलेला ई जलसेवा प्रणालीचा वापर होय. या मध्ये येडगाव धरण शाखेने संगणक कक्ष व ई- जलसेवा सूविधा पूरविणे संबंधीत प्राधान्याने लक्ष केंद्रीत केले आहे.

या शाखा कार्यालयाची सन २०१४-१५ मधील बिगर सिंचन ग्राहकांचे संपूर्ण वसूली ई-जलसेवा प्रणाली मधून करण्यात आलेली आहे. ही एक अत्यंत प्रशंसनीय बाब असून या कार्यालयात संपूर्ण देयक संगणकाद्वारे केले जाते. वसूली, कर व देय ज्या प्रमाणे वापर असेल त्या प्रमाणे ग्राहकांना पूरविण्यात येते विलंब शुल्क सुध्दा ई-जलसेवा प्रणालीमधूनच आकारण्यात येतो. येडगांव धरण शाखा कार्यालय ज्या उपविभागात/ विभागात आहे ते कुकडी उपविभाग क्र. १ नारायगाव यांचेही बिगरसिंचनाचे देयक संपूर्णत: ई-जलसेवा प्रणालीमधूनच दिले जात आहे. राज्यभरातून प्रणाली मधून देयक काढतांना येणाऱ्या अडचणी पाहता या उपविभाग आणि शाखेचे कार्य पाहून बऱ्याच अधिकारी/ कर्मचारी यांच्यात विश्वास निर्माण होईल. ख-या अर्थाने जलसंपदा विभागातून जनसेवेसाठी आधूनिकीकरण प्राप्त करण्यात संपूर्ण राज्याचा हातभार लागेल ही सदिच्छा व्यक्त करुया. चला जलसंपदा विभागाच्या अशा आधुनिक सिंचन शाखा घडवूया !

संदर्भिय कामामध्ये कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायगाव कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री. जी. बी. नानौर , कुकडी उपविभाग क्र.१, नारायणगाव कार्यालयाचे उपअभियंता श्री. बी. जी. सराफ तसेच येडगाव धरण शाखा येथील आर.जी. हांडे (शाखा अभियंता), एस.आर.वायकोडी (दप्तर कारकुन), एच.बी.डावकर (वरिष्ठ दप्तर कारकुन), पी.जी.डूंबरे ( कालवा निरिक्षक) यांचा या देयक वसूलीमध्ये मोलाचा वाटा आहे. या विभागांतर्गत सन २०१३-१४ मध्ये रु ४९.१० लक्ष पैकी रु. ३७.३४ लक्ष वसूली ई-जलसेवा प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. या यशाकरिता ई-प्रशासन, प्रकल्प व्यवस्थापन कार्यालया , पुणे त्यांचे विशेष कौतूक करीत आहे.








### eJalseva News :

1. Hon Pricipal Secretary (WR) reviewed the project of eJalseva on 23/1/2015

2. Hon Secretary (CAD)reviewed the project of eJalseva at KDC, Pune on 26/1/2015

3. DDO registration for 90 % offices is complete in eService Book

4. NI Customers entered in the system are 6640 & in farmer master 1530256 farmers data entry done

Editorial Board | Chief Editor T N Mundhe | Executive Editor Pravin Kolhe | Mrs Purnima Desai | Mr Nandkishor Ranaware | Mrs Dhanshree Limaye | Mr Avinash Patil